<u>मजकुर :—</u>

दिनांक १५/०४/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** <u>माहे फेब्रुवारी २०२१</u> या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## <u>(अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ फेब्रुवारी— २०२१</u>

| | | |
|---|---|---|
| ०३ | सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, | गु.र.क्र. १०/२२१ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, १७०, ३४ भादवि सह ६६(ब), ६६ (क) माहिती तंत्रज्ञान कायदा. |

‘ इंटरनेटवर केंद्र शासनाचे फेक लोन ॲप व फेक वेबसाईट बनवुन आर्थिक फसवणुक’

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री.सुरज गोपाळ सावले, वय २४ वर्षे, यांनी दिनांक ०२/०२/२०२१ रोजी त्यांच्या मोबाईल मध्ये Whatsapp चेक केला असता त्यानां काही अनोळखी Whatsapp नंबर वरुन धमकी व शिवीगाळ होत होती. तसेच फिर्यादीनी त्याच्याकडुन लोनची प्रोसेंसिंग फि घेतल्याचे व ती परत करण्यासाठी मेसेज येत होते. यावरून कोणीतरी अनोळखी इसमाने फिर्यादीच्या मोबाईल क्रमांकचा गैरवापर करीत त्यांचा वैयक्तीक मोबाईल क्रमांक त्याच्या परवानगी शिवाय फेक ॲप मध्ये टाकल्याने व सातत्याने वेगवेगळया मोबाईल क्रमांकावरुन फोन येत असल्याने फिर्यादी यांना मानसिक त्रास होत होता. मोबाईल क्रमांक लोन देण्याचे बहाण्याने ॲपमध्ये वापरुन लोकांची आर्थिक फसवणुक केली तसेच देशभरात बदनामी केली व मोबाईल क्रमांक चुकीच्या पध्दतीने प्रकाशीत केला म्हणुन १) Prandhan Mantri Yojana loan २) PM Loan Yojana ३) Prandhan Mantri Yojana loan, ४) PMYL Loan व ५) Sarvottam Finance Loan Service या नमुद लोन ॲपचे चालक, वापरकर्ता यांच्या विरुध्द कायदेशीर तक्रार दिल्याने गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री.सुरज गोपाळ सावले ,वय—२४ वर्षे, |
| **बळीत** | :— | देशातील अंदाजे ०४ हजार नागरिक |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) संजीव कुमार वीरी सिंह, वय ३६ वर्षे,<br>२) प्रांजुल भुपेनकुमार राठोड, वय २७ वर्षे,<br>३) रामनिवास मुलचंद कुमावत, वय २५ वर्षे,<br>४) विवेक दिनेशबाबू शर्मा, वय ४२ वर्षे,<br>आरोपी क्रमांक ०१ दिनांक १५/०२/२०२१ रोजी<br>आरोपी क्रमांक ०२ दिनांक १६/०२/२०२१ रोजी<br>आरोपी क्रमांक ०३ व ०४ दिनांक १९/०२/२०२१ रोजी |

<u>तपास कौशल्य :—</u> दिनांक ०२/०२/२०२१ रोजी फिर्यादी मोबाईल मध्ये **Whatsapp** चेक करत असताना त्यानां काही अनोळखी **Whatsapp** नंबर वरुन मेसेज येत होते. “**Hello Prandhan Mantri Yojana loan I want your help**” असा आशयचा मेसेज फिर्यादीना अनोळखी नंबर वरुन येत होते. काही नंबरवरुन फिर्यादीनां धमकी व शिवीगाळ होत होती. तसेच फिर्यादीनी त्याच्याकडुन लोनची प्रोसेंसिंग फि घेतल्याचे व ते परत करण्यासाठी मेसेज येत होते. सदरबाबत फिर्यादीनां काहीच कळत नव्हते की हे काय आहे? फिर्यादींच्या **Whatsapp** वर आलेले काही मोबाईल नंबर खालील प्रमाणे १) ९५५४३४९०९९ उत्तर प्रदेश. २)९९८५१९९१०१ हैद्राबाद ३) ८१४९२६८०६७ तामिळनाडु ४)७२२४८६६४९२ कर्नाटक ५)९७१९९२६७६३ उत्तर प्रदेश असे होते.

सायबर पोलीसांनी सर्वप्रथम गुगल प्लेस्टोअर वरून १फेक लोन ॲप डाउनलोड केले. यासारखे

ईतर ०८ ॲप असल्याचे समजले. सदरचे ॲप गुगल प्लेस्टोअरला कोनी अपलोड केले याबाबत गुगलकडुन मोबाईल नंबर व मेल आयडी मिळवला. सदर मोबाईल नंबरचा सीडीआर व एसडीआर संबंधीत कंपणीकडून प्राप्त केला तपासादरम्यान सदर मोबाईल नंबरचा सीडीआर राजस्थानचा असल्याचे निदर्शनास आले परंतु सदर मोबाईलचे करण्ट लोकेशन अलीगड उत्तर प्रदेश असल्याचे समजले. तसेच सीडीआरचे विश्लेशन केले असता सदर मोबाईल क्रमांकावरून ५०००पेक्षा जास्त कॉल झाल्याचे निदर्शनास आले. सदरचे सर्व कॉल हे लोन देण्याच्या बहाण्याने लोकांची फसवणुक करण्याकरिता केल्याचे निष्पन्न झाले. सदर लोकांना प्रत्यक्ष कॉल करून खत्री करून त्यांनी पैसे भरलेल्या अकाउंटचीही माहीती घेण्यात आली. त्यातुन मिळालेले मोबाईल नंबर हे जयपुर राजस्थान व अलीगड, राज्य उत्तर प्रदेश येथील असल्याचे समजले.

तपासा दरम्यान मेल आयडीचे रिप्लाय प्राप्त झाले. त्यातुन काही मोबाईल नंबर मिळाले असता त्याचेही सीडीआर राजस्थानचा असल्याचे प्राप्त झाले. परंतु सदर मोबाईलचे करण्ट लोकेशन अलीगड उत्तर प्रदेश असल्याचे समजले. त्यानंतर ॲपमधील मोबाईल नंबर यांचेही सीडीआर राजस्थानचा असल्याचे प्राप्त झाले त्याचेही मोबाईलचे करण्ट लोकेशन अलीगड उत्तर प्रदेश येथील असल्याचे समजले.

सदर फेक लोन ॲप चा तपास करताना सदर फेक लोन ॲपचे डेव्हलपर ॲप बनवणारे हे राजस्थानचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यांचे मोबाईल नंबर, मेल आयडी, फेसबुक अकाउंटवरून त्यांनीच ॲप बनविल्याचे निष्पन्न झाले. सदर मोबाईल नंबरवरून व मेल आयडीवरून पंतप्रधान लोन योजनेच्या नावाने ०३ वेबसाईट असल्याचे देखील समजले. सदरचे वेब डेव्हलपर हे सुध्दा रजस्थानचे असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयातील एकुन ०४ आरोपींचे एकमेकांशी संभाषन झाल्याचे व ते अधुनमधुन जयपुर, राजस्थान ते अलीगड, राज्य उत्तर प्रदेश येथे प्रवास करत असल्याचे सी डी आर मध्ये निष्पन्न झाले.

अलीगड, राज्य उत्तर प्रदेश, येथे ०२ आरोपी कॉल सेन्टर चालवत होते. अलीगड येथेल आरोपींने त्याच्या काही जवळच्या लोकांना कॉल केला होता. त्यातील एका इसमास कॉल करून भेटण्यासाठी बोलावले व त्याच्याव्दारे आरोपी पर्यत तपासी पथक पोहोचले व त्यास अटक करण्यात आली. तसेच आरोपी चालवत असलेले कॉल सेंटरवरून गुन्हयाशी संबधित मुददेमाल जप्त करण्यात आला. व दुसऱ्या आरोपीलाही अटक करण्यात आली. त्यादरम्यान त्यांच्याशी संगतमत करून गुन्हा करणारे इतर दोन आरोपी राजस्थान येथे असल्याचे सांगितले. त्यांचे लोकेशन चेक केले असता ते राजस्थान येथे असल्याचे समजले. त्याप्रमाणे जयपुर, राज्य राजस्थान, येथे जावुन ०२ आरोपींना अटक करण्यात आली. व गुन्हयाशी संबधीत मुददेमाल पंचनाम्याअंर्तगत जप्त करण्यात आला.

अशा प्रकारे सायबर पोलीस ठाणेच्या तपासी पथकाने जयपुर राजस्थान व अलीगड उत्तर प्रदेश येथे केंद्र शासनाच्या पंतप्रधान लोन योजनेच्या नावाने चालवणारे कॉल सेन्टर उध्वस्त केले आहे. तसेच सदर गुन्हयात एकुन ०४ आरोपींना अटक केली आहे. व भारतातीन लाखो लोकांचा पर्सनल डाटा व पैशांची बचत केली आहे. सदरचा गुन्हा हा तांत्रिक दृष्टया किलष्ट व वेळखाऊ असुनही कमी वेळेत तपासी पथकाने तपास पुर्ण केला आहे. तपासाच्या अनुषंगाने बाहेरील राज्यात युपी, राजस्तान येथे जाउन आरोपींना अटक केलेली आहे. सदरचा गुन्हा उघडकिस आणल्यामुळे देशातील लाखो गरीब जनतेचा फसवणुकीपासुन बचाव झालेला आहे.

भारत देशाचे पंतप्रधानांच्या नावाचा वापर करून चालविणारा फ्रॉड उघडीस आणला आहे. शासनाच्या नावाने ०९ फेक लोन ॲप, व फेक ०३ वेबसाईट तयार करूण हजारो लोकांची फसवणुक करण्यात आली आहे. सदर गुन्हा उघडकीस आणल्याने भविष्यात आशापकारची फसवणुक होण्यास प्रतिबंध होइल. सदरचा गुन्हा उघडकिस आल्यामुळे सामान्य जनतेमध्ये लोन घेण्यासंदर्भात जन जागृती निर्माण झाली आहे. तसेच गुन्हयातील मुख्य आरोपी राजकीय पक्षाचा सदस्य असल्याने निर्माण होणारा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न तपासी पथकाने अतिशय कौश्ल्यपुर्ण हाताळला आहे. गुन्हा उघडकीस आणल्याने जनतेमध्ये पोलीसांची प्रतीमा उजळुन पोलीसांनवर जनतेचा विश्वास वाढला आहे.

सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उप आयुक्त | डॉ. रश्मी प्रकाशचंद्र करंदीकर | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहाय्यक पोलीस आयुक्त | नितिन केशवराव जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ३ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | शर्मिला श्रीकांत सहस्रबुध्दे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अलका धिरज जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | संतोष चंद्रकांत मस्तुद ( कक्ष—०७,गुप्रशा,गुअवि) | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो ना ९७००७२ | प्रफुल्ल हिरप्पा सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो ना ००८७८ | मुरलीधर पांडु सपकाळे ( कक्ष—०७,गुप्रशा,गुअवि) | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो शि ०९३६३३ | प्रविण एकनाथ सुरवसे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो शि १५१२५९ | अभिजित नथुराम देसाई, | प्रशस्तीपत्रक |

<u>मजकुर :—</u>

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" BEST CONVICTION OF THE MONTH "** <u>माहे जानेवारी —२०२१</u> या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## <u>ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जानेवारी — २०२१</u>

<table>
<tr><td>०१</td><td>गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—१०</td><td><u>अल्पवयीन मुलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार</u><br>गुप्रशा.,गुअवि. गु.र.क्र. ३६/२०१५, कलम ३२३, ३२६, ३६३, ३६६(अ), ३७६(२)(आय), ५०६ भादंवि सह ३, ४, ५ (आय), ६ लैंगिक अपराधांपासून बालकांचे सरंक्षण अधिनियम—२०१२, (आरे पोलीस ठाणे, गुरक्र. ००/१५ आणि सहार पो.ठाणे, गुरक्र. ७२/१५)</td></tr>
</table>

—: <u>अल्पवयीन मुलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार</u> :—

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— दिनांक ०१/०३/२०१५ रोजी २२.०० वा. चे सुमारास जे. डी. मैदान, मरोळ पाईप लाईन, सहार, अंधेरी पूर्व, मुंबई या ठिकाणावरुन गुन्हयातील बळीत मुलगी कुमारी अनामिका सुरेंद्र गुप्ता, वय ५ वर्षे ही दुधाची पिशवी घेवुन तिचे घरी पायी जात असताना आरोपी शिवकुमार उर्फ शिवा रामलखन राणा, वय ३० वर्षे याने तिला तो चालवित असलेल्या पिवळया हुडची भाडोत्री ऑटो रिक्षा क्र. एमएच—०२—टीए—७९३० मध्ये 'मैं तुम्हारे पिताजी को पहचानता हूँ, मैं तुम्हे घर छोडता हुँ' असे खोटे सांगुन तिला धमकावुन जबरीने रिक्षात पुढे बसवुन फिर्यादी श्री. सुरेंद्र गुप्ता यांचे कायदेशीर रखवालीतून तिचेवर लैंगिक अत्याचार करण्याच्या उद्देशाने पळवुन नेले.

त्यानंतर बळीत मुलीला आरे कॉलनी परिसरातील जंगलात नेवुन २२.३० ते २३.०० वा. चे दरम्यान नमूद ऑटो रिक्षाचे पाठीमागील सीटवर बळीत मुलीला मारहाण करुन तिचे कपडे काढुन, तिच्या गुप्तांगाला चावा घेतला, तसेच तिचेशी जबरी संभोग केला आणि बळीत मुलीला तिच्या गुप्तांगाला अत्यंत वेदनादायी अशा गंभीर स्वरुपाच्या दुखापती केल्या. म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. सुरेंद्र नंदलाल गुप्ता, वय ३० वर्षे, |
| बळीत/मयत | :— | कुमारी अनामिका सुरेंद्र गुप्ता वय ५ वर्षे, (फिर्यादींची मुलगी) |
| आरोपी अटक व दिनांक | :— | शिवकुमार उर्फ शिवा रामलखन राणा, वय ३० वर्षे<br>दिनांक १०/०३/२०१५ |
| निकाल दिनांक | :— | २१/०१/२०२१ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) पोक्सो अधिनियम कलम ६ अन्वये सक्त मजूरीसह आजन्म कैद व रू. ४० हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह ६ महिने कैद,<br>२) भादंविसं. कलम ३६३ अन्वये सक्त मजूरीसह ५ वर्षे, कैद व रू. ७ हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह ३ महिने कैद,<br>३) कलम ३२३ अन्वये सक्त मजूरीसह १ वर्षे, कैद व रू. १ हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह १ महिना कैद,<br>४) कलम ५०६ अन्वये सक्त मजूरीसह २ वर्षे, कैद व रू. २ हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह १ महिना कैद, |

<u>तपास कौशल्य</u> :— वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती गोपिका जहागिरदार, (सध्या सपोआ) आणि कक्षातील तत्कालीन आणि वर्तमान पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी गुन्हा नोंद झाल्यानंतर सातत्याने रिक्षाचे जुजबी वर्णनावरून सुमारे १५० पेक्षा जास्त रिक्षांची तपासणी केली. गुन्हयाचा तपास करुन दि. १०/०३/२०१५ रोजी आरोपीस रिक्षासह ताब्यात घेवून अटक केली. आरोपीविरुध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र सादर केले. तसेच यातील साक्षीदार व पंच यांना मा. न्यायालयाच्या सुनावणी तारखेस वेळोवेळी हजर करुन मा.न्यायालयात साक्षीदार यांनी

सरकार पक्षातर्फे समर्थपणे साक्ष दिल्याने आरोपीविरूध्द दोषसिध्द होवून आरोपी शिवकुमार उर्फ शिवा रामलखन राणा, वय ३० वर्षे यास वर नमुद प्रमाणे शिक्षा झालेली आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—१०, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी पोलीस निरीक्षक | विनय घोरपडे, | प्रशस्तीपत्रक |
| २ | तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक | गोपिका शेषदास जहागिरदार (सध्या सपोआ) | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पैरवी अधिकारी | सपोनि.वाहीद अ. पठाण, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोहले.२७७२० | मोहन जा. घाणेकर | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोहक्र.२९८२५, | कल्याण नि. बाबर | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोहक्र. ३०७४१, | चंद्रकांत गो. गवेकर, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोना.०३१०९, | अजित द. पाटील | प्रशस्तीपत्रक |